महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०
संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E mail: evaluationdept@maa.ac.in

---

# Question Bank

Standard :- 12th

Subject :- अर्थशास्त्र

**सूचना**

१. फक्त विद्यार्थ्यांना प्रश्नप्रकारांचा सराव करून देण्यासाठीच

२. सदर प्रश्नसंचातील प्रश्न बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेत येतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.

# प्रश्नपेढी ( अर्थशास्त्र ) इयत्ता - 12 वी

## प्रश्न 1 वस्तुनिष्ठ प्रश्न

### योग्य पर्याय निवडा

१) सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती

अ)वस्तूच्या किंमत निश्चितीचे सिद्धान्त

ब) आर्थिक वृद्धी व विकासाचे सिद्धान्त

क) सर्वसाधारण किंमत पातळी सिद्धान्त

ड) उत्पन्न व रोजगार सिद्धान्त

पर्याय : १) फक्त अ , २) अ,ब,क ३) ब,क,ड ४) अ,क,ड

२) स्थूल अर्थशास्त्राशी सबंधित विधान -------

अ) स्थूल अर्थशास्त्र संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास

ब) स्थूल अर्थशास्त्र विशिष्ट गृहितकावर आधारित

क) स्थूल अर्थशास्त्र एकूण घटकाच्या वर्तनाशी आणि त्यांच्या कार्य पद्धतीशी सबंधित

ड) स्थूल अर्थशास्त्र हे आर्थिक समस्या सोडविणाऱ्या धोरणांची चर्चा करणारेशास्त्र आहे

पर्याय : १)अ,ब,क,ड २) अ,ब,क ३) ब,क,ड ४) अ,क,ड

३) घटत्या सीमांत उपयोगीतेचे अपवाद

अ) संस्थात्मक साधन

ब) छंद

क) कंजूष व्यक्ती

ड) पैसा

पर्याय : १) फक्त अ २) अ,ब,क ३) ब,क,ड ४) अ,क,ड

४) घटत्या सीमांत उपयोगीतेवरची टीका

अ) अवास्तव गृहीतके

ब) अविभाज्य वस्तूसाठी लागू पडत नाही

क) हा सिद्धान्त विशिष्ट वेळी एकाच गरज पूर्ण करून मिळणाऱ्या समाधाना पुरता मर्यादित

ड) प्रत्यक्षात उपयोगीतेचे संख्यात्मक मापन करणे अशक्य असते.

पर्याय : १) फक्त अ २) अ,ब,क ३) ब,क,ड ४) अ,ब,क,ड

५) गीफेनचा विरोधभासा सबंधित विधान

अ) मागणीच्या नियमाचा अपवाद
ब) कनिष्ठ वस्तू किंवा हलक्या प्रतीच्या वस्तूमध्ये समावेश होतो.
क) कनिष्ठ वस्तूची किंमत कमी झाली असता मागणी वाढते.
ड) हा विरोधाभास आल्फ्रेड मार्शल यांनी ओळखला
पर्याय : १) फक्त अ  २) अ,ब  ३) ब,क,ड  ४) अ,ब,क,ड

६)मागणीच्या ऱ्हासाशी संबधित विधाने

अ) हा मागणीच्या बदलातील एक प्रकार आहे.
ब) इतर परिस्थिती जसे उपभोक्त्यांच्या आवडीनिवडी.उपभोक्त्याचे उत्पन्न इ.प्रतिकूल बदल होतो तेव्हा मागणीचा ऱ्हास होतो.
क) या प्रकारामुळे किंमत बदलत नाही
ड) मागणी वक्र हा मूळ मागणी वक्राच्या उजवीकडे स्थानांतरीत होतो.
पर्याय : १) अ,ब,क,ड  २) अ,ब,क  ३) ब,क,ड   ४) अ,क,ड

७) संपूर्ण अलवचिक मागणीशी सबंधित चुकीची विधाने

अ) किंमतीमध्ये कितीही शेकडा बदल झाला तरी मागणी बदलत नाही
ब) Ed = 1
क) मागणी वक्र 'क्ष ' अक्षाशी समांतर
ड) किमंत लवाचीकतेचा एक प्रकार
पर्याय : १) अ,ब,क,ड  २) अ,ब,क   ३) ब,क  ४) अ,ब

८) छेदक लवचिकतेशी सबंधित विधाने

अ) छेदक लवचिकता म्हणजे एका वस्तूच्या किंमतीतील बदलास
ब) मागणीच्या लवचिकतेचा एक प्रकार आहे.
क) हे पूरक व स्पर्धात्मक मागणीशी संबंधित आहे.
ड) मागणीची छेदक लवचिकता = मागणीतील शेकडा बदल / किंमतीतील शेकडा बदल
पर्याय १) अ,ब,क,ड २) अ,ब,क  ३) फक्त ब   ४) अ,ब

९ ) साठ्याशी सबंधित विधाने

अ) विशिष्ट कालावधीत  विक्रेत्याकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेली एकूण नगसंख्या म्हणजे साठा होय.

ब) उत्पादन वाढले असता साठा वाढतो.

क) साठा हा पुरवठ्यापेक्षा नेहमीच जास्त असतो.

ड) साठा ही प्रवाही संकल्पना आहे.

पर्याय : १) अ,ब,क,ड २) अ,ब,क ३) फक्त ब ४) अ,ब

१० )पुरवठ्याचे अपवाद

अ) स्थिर उत्पादन खर्च

ब) स्थिर उत्पादन तंत्र

क) कृषी उत्पादने

ड) हवामानाच्या स्थितीत बदल नाही

पर्याय : १) अ,ब,क,ड २) अ,ब,क ३) फक्त क ४) अ,ब

११) अल्पाधिकार बाजाराची वैशिष्ट्ये

अ) कांही विक्रेते

ब) भिन्न विक्रेते उत्पादनाची विक्री करतो

क) मुक्त प्रवेश व निर्गमन

ड) या बाजारात लक्षणीय अनिश्चितता असते.

पर्याय : १) अ,ब २) अ,ब,क ३) ब,क ४) अ,ड

१२) दीर्घ काळाच्या बाजाराची वैशिष्ट्ये

अ) उत्पादन घटक आणि खर्च बदलू शकतात

ब) दीर्घकाळात उद्योगसंस्थाना सर्व प्रकारच्या जुळवून घेणे शक्य होते

क) हा कालावधी पाच वर्षापेक्षा अधिक असतो.

ड) वस्तूचा पुरवठा वाढविता येत नाही

पर्याय : १) अ,क,ड २) अ,ब,क ३) ब,क,ड ४) अ,ब,क,ड

१३) निर्देशांकाची वैशिष्ट्ये

अ) आर्थिक धोरण ठरवण्यासाठी याचा वापर होतो.

ब) आर्थिक माहिती वास्तव स्वरुपात सादर करण्यात मदत होते.

क) निर्देशांक हे सांख्यकीय साधन आहे.

ड) निर्देशांक हे सरासरी काढण्याचे विशिष्ट साधन आहे.

पर्याय : १) क,ड २) अ,ब ३) ब,क,ड ४) अ,ब,क,ड

१४) भारान्वित निर्देशांकाशी सबंधित विधाने

अ) या पद्धतीत विविध वस्तूंना योग्य भार देण्यात येतो

ब) यात समूहातील वस्तूंना सापेक्ष महत्त्व दिले जाते.

क) यामध्ये 'संख्या ' भारांश म्हणून वापरली जाते.

ड) लासपेयर  किंमत निर्देशांक व पाश्चे निर्देशांक या दोन पध्दतीचा वापर भारान्वित निर्देशांक तयार करण्यासाठी केला जातो.

पर्याय : १) अ,क,ड   २) अ,ब,क    ३) ब,क,ड    ४) अ,ब,क,ड

१५) उत्पादन पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना घ्यावयाच्या दक्षता

अ) दुहेरी गणना टाळण्यासाठी फक्त अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य मोजते

ब) अप्रत्यक्ष कराची किंमत वगळावी

क) कांही वस्तूसाठी शासनाने दिलेली अनुदानाची रक्कम मोजावी

ड) जुन्या वस्तूंची खरेदी विक्री राष्ट्रीय उत्पन्नात मोजली जावी.

पर्याय : १) फक्त अ   २) अ,ब,क   ३) ब,क,ड      ४) अ,क,ड

१६) राष्ट्रीय उत्पन्न मोजमापाच्या व्यावहारिक अडचणी

अ) बेकायदेशीर व्यवहारापासून मिळणारे उत्पन्न

ब) दुहेरी गणनेची समस्या

क) अपूरी आणि अविश्वसनिय  सांख्कीय आकडेवारी

ड) मालाच्या साठ्याचे मूल्य

पर्याय : १) अ,क   २) अ,ब,क   ३) ब,क,ड     ४) अ,क,ड

१७) कराची महत्त्वाची वैशिष्ट्ये

अ) कर हा शासनाला स्वेच्छेने द्यावयाचा असतो.

ब) ज्या नागरिकावर कर लागू होतो त्यांनी तो देणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे.

क) कर उत्पन्न,मालमत्ता,किंवा वस्तू व सेवावर लागू केला जातो

ड) कराच्या मोबदल्यात करदात्याला शासनाकडून भेट व प्रमाणशीर लाभ किंवा सेवा घेण्याचा अधिकार असतो.

पर्याय : १) अ,ड   २) ब,क  ३) ब,क,ड   ४) अ,क,ड

१८) करेत्तर उत्पनाचे स्त्रोत

अ) विशेष अधिभार

ब) दंड व दंडात्मक रक्कमा

क) वस्तू व सेवा कर

ड) भेटी अनुदाने देणग्या

पर्याय : १) अ,ब,ड   २) अ,ब,क   ३) ब,क,ड    ४) अ,क,ड

१९) नाणे बाजारातील संघटित क्षेत्र

अ) भारतीय रिझर्व्ह बँक
ब) व्यापारी बँका
क) सहकारी बँका
ड) स्थानिक बँकर्स
पर्याय : १) अ,ब,ड  २) अ,ब,क  ३) ब,क,ड  ४) अ,क,ड

२०) व्यापारी बँकाचे वर्गीकरण

अ) सार्वजनिक क्षेत्रातील बँक
ब) खाजगी क्षेत्रातील बँका
क) विदेशी बँका
ड) मध्यवर्ती बँका
पर्याय : १) फक्त अ  २) अ,ब,क  ३) ब,क,ड  ४) अ,क,ड

२१) भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेची वैशिष्ट्ये

अ)स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा वाढता हिस्सा
ब) व्यापाराच्या आकारमानात व मूल्यात वाढ
क) श्रमविभागणी आणि विशेषीकरण
ड) किंमत पातळीतील स्थैर्य
पर्याय : १) अ,ड  २) अ,ब  ३) ब,क  ४) क,ड

२२) व्यापारतोल सबंधित चुकीची विधाने

अ) व्यापार्तोलाला आंतरराष्ट्रीय व्यापारतोल असेही म्हणतात
ब) निर्यात मूल्य आयात मूल्यापेक्षा जास्त असेल तर त्याला अनुकूल व्यापारतोल असे म्हणतात.
क) जर आयात मूल्य निर्यात मूल्यापेक्षा जास्त असेल तर त्याल प्रतिकूल व्यापारतोल असे म्हणतात
ड) व्यापारतोलाचा सबंध दृश्य वस्तूंच्या आयात निर्यात मूल्याशी होतो.
पर्याय ; १) फक्त ड  २) फक्त अ  ३) ब,क,ड  ४) अ,ब,क

**सहसबंध पूर्ण करा.**

१) सूक्ष्म अर्थशास्त्र : मायक्रोस :: स्थूल अर्थशास्त्र : -----------
२) सर्वसाधारण समतोल : स्थूल अर्थशास्त्र :: ----------- : सूक्ष्म अर्थशास्त्र
३) मातीपासून खेळणी : -----------:: लोकरीची कपडे : स्थल उपयोगिता
४) सर्व नगांच्या उपभोगापासून प्राप्त होणारी उपयोगिता : एकूण उपयोगिता :: वाढीव वस्तूच्या उपभोगापासून प्राप्त होणारी उपयोगिता: ----------
५) मागणी वक्र : --------- :: पुरवठा वक्र : वर जाणारा.
६) चहा आणि कॉफी : --------- :: वीज : संमिश्र मागणी
७) जास्त लवचिक मागणी : Ed > 1 :: कमी लवचिक मागणी : ----------
८) तीव्र उताराचा मागणी वक्र : कमी लवचिक मागणी :: पसरट मागणी वक्र : ----------
९) एकूण खर्च : एकूण स्थिर खर्च + एकूण बदलता खर्च :: सरासरी खर्च : -------
१०) पुरवठ्याचा विस्तार : किंमत वाढ :: पुरवठ्याचा संकोच : --------
११) पूर्ण स्पर्धा : मुक्त प्रवेश आणि निर्गमन :: -----------: प्रवेशावर निर्बंध
१२) मक्तेदारी : मुल्यभेद :: ---------- : वस्तुभेद
१३) ------------ : मूळ वर्ष किंमत :: P १ : चालू वर्ष किंमत
१४) लासपेयरचा निर्देशांक : ---------- :: पाश्चेचा निर्देशांक : चालू वर्षाचे परिमाण
१५) --------- : उपभोग खर्च +गुंतवणूक + सरकारी खर्च + (निर्यात – आयात) :; स्थू.रा.उ. = उपभोग खर्च +गुंतवणूक + सरकारी खर्च + (निर्यात – आयात) + ( निव्वळ येणी – देणी)
१६) उत्पादन पध्दत : ----------- :: उत्पन्न पध्दत : घटक खर्चानुसार पध्दत
१७) ---------- : परकीय आक्रमणापासून संरक्षण :: ऐच्छिक कार्ये : सामाजिक सुरक्षा योजनांची तरतूद
१८) उत्पन्न कर : प्रत्यक्ष कर :: वस्तू व सेवा कर : --------
१९) ----------- : व्यापारी बँका :: पतनियंत्रण : मध्यवर्ती बँक
२०) प्राथमिक बाजार : -------- ;: दुय्यम बाजार : जुने रोखे
२१) दुसऱ्या देशाकडून केलेली वस्तू व सेवांची खरेदी : ------------ ;; दुसऱ्या देशाला केलेली वस्तू व सेवांची विक्री ; निर्यात
२२) निर्यात मूल्य > आयात मूल्य : अनुकूल व्यापारतोल :: आयात मूल्य > निर्यात मूल्य : ----------

## आर्थिक पारिभाषिक शब्द

१) अर्थव्यवस्थेची अशी शाखा जी अर्थव्यवस्थेच्या लहान भागाशी संबंधित आहे.

२) अर्थव्यवस्थेतील सध्यस्थितीत उत्पादित केलेल्या सर्व वस्तू व सेवांच्या किंमतीची सरासरी.

३) वस्तूची मालकी एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरीत होते.

४) वस्तूंच्या सर्व नगांच्या उपभोगापासून उपभोक्त्याला प्राप्त होणाऱ्या एकत्रित उपयोगितेची बेरीज.

५) विशिष्ट काळात विशिष्ट किंमतीला बाजारातील सर्व उपभोक्त्यांनी केलेली मागणी.

६) एका वस्तूंची मागणी जी अनेक उपयोगासाठी केली जाते.

७) उत्पन्नातील बदलाचा परिणाम म्हणून मागणीत घडून येणारा बदल.

८) किंमतीत अल्प किंवा जास्त बदल न होता मागणीत अनंत होणारा बदल.

९) इतर घटक स्थिर असताना किंमतीत वाढ झाल्यास पुरवठा देखील वाढतो.

१०) एका जादा नगसंख्येचे उत्पादन केल्यानंतर खर्चात झालेली निव्वळ वाढ.

११) बाजाराचा असा प्रकार की ज्यात स्पर्धायुक्त बाजाराची सर्व वैशिष्ट्ये आढळत नाहीत तर कांही वैशिष्ट्ये आढळतात.

१२) एकमेकांना जवळचा पर्याय असणाऱ्या व वस्तुभेद निर्माण करणाऱ्या संस्थाचा समुदाय .

१३) अर्थव्यवस्थेच्या उत्पादनातील किंवा उत्पादनाच्या भोतिक प्रमाणातील बदल मोजणारा निर्देशांक.

१४) संस्थाची अशी शृंखला कि जिच्या आधारे काल व स्थान पदमालेतील बदलाचे मापन करता येते.

१५) देशाच्या भोगोलिक सीमारेषेत एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित केलेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे बाजारभावानुसार येणारे स्थूल मूल्य.

१६) उत्पादन प्रक्रियेमध्ये वापरल्या जाणाऱ्या भांडवली वस्तू व यंत्रसामग्रीची होणारी झीज.

१७) वस्तू व सेवांवर लागू केला जाणारा कर.

१८) सरकारचे सार्वजनिक खर्च व सार्वजनिक उत्पन्नाशी निगडीत असणारे धोरण.

१९) ठराविक कालावधीसाठी ठेवल्या जाणाऱ्या ठेवी.

२०) पैशाच्या प्रमाणाचे व्यवस्थापन करून आर्हिक विकासाची गती वाढविण्यासाठी मध्यवर्ती बँकेद्वारे लागू केलेले धोरण.

२१) एका देशाने दुसऱ्या देशाकडून केलेली वस्तू व सेवांची खरेदी.

२२) एका वर्षाच्या कालावधीत देशाच्या सर्व आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांची पद्धतशीरपणे केलेली नोंदणी.

## विसंगत शब्द ओळखा

१) सूक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये : किंमत सिद्धान्त,विभाजन पद्धत, मर्यादित व्याप्ती,राशी पद्धत.

२) स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती : उत्पादन घटकाच्या किंमत निश्चितीचे सिद्धान्त,उत्पन्न व रोजगार सिद्धान्त,सर्वसाधारण किंमत सिद्धान्त व भाववाढ, विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धान्त.

३) घटत्या सीमांत उपयोगिता सिद्धांताचे अपवाद : कंजूष व्यक्ती, छंद, व्यसन, सट्टेबाजी

४) उपयोगीतेचे प्रकार : एकूण उपयोगिता, काल उपयोगिता, स्वामित्व उपयोगिता, सेवा उपयोगिता.

५) मागणी सिद्धांताची गृहीतके : स्थिर उत्पन्न पातळी,कर धोरणात बदल नाही,लोकसंख्येच्या आकारमानात बदल नाही,संख्यात्मक मापन.

६) मागणीचे प्रकार : वैयक्तिक मागणी,प्रत्यक्ष मागणी,स्पर्धात्मक मागणी, पूरक मागणी.

७) मागणीच्या लवचिकतेचे प्रकार : एकक लवचिक,उत्पन्न लवचिक,छेदक लवचिक,किंमत लवचिक.

८) मागणीची किंमत लवचिकता मोजण्याच्या पध्दती : गुणोत्तर पद्धत,एकूण खर्च पद्धत, उत्पन्न पद्धत, भूमिती पद्धत.

९) पुरवठा सिद्धांताचे अपवाद : रोख रकमेची तीव्र गरज,नाशवंत वस्तू,कृषी उत्पादने,प्रतिष्ठेच्या वस्तू.

१०) खर्च संकल्पना : एकूण खर्च,सीमांत खर्च,सरासरी खर्च,उत्पादन खर्च.

११) स्थळानुसार बाजार : स्थानिक बाजारपेठ,राष्ट्रीय बाजारपेठ,आंतरराष्ट्रीय बाजारपेठ,दीर्घकाळ बाजार.

१२) विक्री खर्च : दूरदर्शन प्रसारणाचा खर्च,साठेबाजी,प्रदर्शन,फलक जाहिराती.

१३) निर्देशांकाचे प्रकार : किंमत निर्देशांक,संख्यात्मक निर्देशांक,साधा निर्देशांक,मूल्य निर्देशांक.

१४) निर्देशांक रचनेच्या पायऱ्या : वस्तूंची निवड,मूळ वर्षाची निवड, खर्चाची निवड,वस्तूंच्या किंमतीची निवड.

१५) राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पना : स्थूल देशांतर्गत उत्पादन,निव्वळ राष्ट्रीय उत्पादन,आयुर्विमा महामंडळ, स्थूल राष्ट्रीय उत्पादन.

१६) राष्ट्रीय उत्पन्न मोजताना येणाऱ्या व्यावहारिक अडचणी : दुहेरी गणनेची समस्या,अविश्वसनीय सांख्यिकीय आकडेवारी,बेकायदेशीर व्यवहारापासून मिळणारे उत्पन्न,घसारा.

१७) करेत्तर उत्पन्न : विशेष अधिभार, विशेष कर,वस्तू व सेवा कर,शुल्क.

१८) सरकारची ऐच्छिक कार्ये : शिक्षण व आरोग्य सेवांची तरतूद,सामाजिक सुरक्षा उपाय,परकीय आक्रमणापासून संरक्षण,कल्याणकारी उपाय.

१९) संघटित क्षेत्र : सहकारी बँका,व्यापारी बँका,सावकार,भारतीय रिजर्व्ह बँक

२०) अनियंत्रित बिगर बँक वित्तीय मध्यस्थ : स्थानिक बँकर्स, चिटफंड, निधी, कर्ज कंपन्या.

२१) विदेशी व्यापाराचे प्रकार : आयात व्यापार, निर्यात व्यापार,पुनर्निर्यात व्यापार, राष्ट्रीय व्यापार.

२२) नवीन बंदरांचा विकास : कांडला, कोचीन, मुंबई, नावाशेवा.

## विधाने पूर्ण करा

१) आर्थिक कल्याणाचे सिद्धान्त प्रामुख्याने --------

अ)साधनसामुग्रीचा कार्यक्षम वाटपाशी संबंधित आहे.

ब)उत्पादन घटकाशी संबंधित आहे.

क)वस्तूच्या किंमत निश्चीतीशी संबंधित आहे.

ड) उत्पादन क्षेत्रातील कार्यक्षमतेशी संबंधित आहे.

२) स्थूल अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची शाखा --------

अ)अशंत:अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करते.

ब) संपूर्ण अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करते.

क) मिश्र अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करते.

ड) राजकीय अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करते.

३) ज्या नगाला सीमांत उपयोगिता व किंमत समान असतात त्या नगाला ----------

अ) विक्रेत्याचा समतोल म्हणतात.

ब) उपभोक्त्याचा समतोल म्हणतात.

क) आंशिक समतोल म्हणतात.

ड) सर्वसाधारण समतोल म्हणतात.

४) एकूण उपयोगिता व सीमांत उपयोगिता यांच्या संबंधामध्ये सीमांत उपयोगिता जेव्हा ऋण होते तेव्हा एकूण उपयोगिता ---------

अ) वाढते

ब) स्थिर असते.

क) कमी होते

ड) शून्य होते.

५) एका वस्तूची मागणी अनेक उपयोगासाठी केली जाते तेव्हा त्यास -----------

अ) संमिश्र मागणी असे म्हणतात.

ब) पूरक मागणी असे म्हणतात.

क) प्रत्यक्ष मागणी असे म्हणतात.

ड) परोक्ष मागणी असे म्हणतात.

६) मागणीचा नियम ---------

अ) अडम स्मिथ यांनी मांडला

ब) आल्फ्रेड मार्शल यांनी मांडला

क) जॉन रॉबिन्सन यांनी मांडला

ड) केन्स यांनी मांडला.

७) मागणी वक्र जेव्हा 'य' अक्षास समांतर असतो तेव्हा त्याला ----------

अ) संपूर्ण लवचिक मागणी म्हणतात.

ब) संपूर्ण अलवचिक मागणी म्हणतात.

क) जास्त लवचिक मागणी म्हणतात.

ड) कमी लवचिक मागणी म्हणतात.

८) Ed = 0 हा अनुभव येणाऱ्या वस्तू --------

अ) चैनीच्या असतात

ब) सर्वसाधारण असतात

क) अत्यावश्यक असतात.

ड) सुखसोयीच्या असतात

९) पुरवठा वक्रावर खालच्या बाजूस सरकणारा वक्र ---------

अ) पुरवठ्याचा संकोच दाखवितो.

ब) पुरवठ्यातील घट दाखवितो

क) पुरवठ्याचा विस्तार दाखवितो.

ड) पुरवठ्यातील वाढ  दाखवितो

१०) एका जादा नगसंख्येचे उत्पादन केल्यानंतर एकूण खर्चात झालेली निव्वळ वाढ म्हणजे

अ) सरासरी खर्च

ब) सीमांत खर्च

क) एकूण खर्च

ड) बदलता खर्च

११) पूर्ण स्पर्धेत वस्तूची किंमत मागणी आणि पुरवठा यांच्या आंतरक्रियेतून निश्चित होते ती  -------------

अ) बाजार किंमत

ब)साधारण किंमत

क) अस्थिर किंमत

ड)समतोल किंमत

१२) वस्तुभेद हे या स्पर्धेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे------

अ) पूर्ण स्पर्धा

ब) मक्तेदारीयुक्त स्पर्धा

क) मक्तेदारी

ड) अल्पाधिकार

१३)  निर्देशांक हा मुलत: या पातळीमधील बदल मोजण्यासाठी विकसित केला होता.

अ) संख्यात्मक पातळी

ब) किंमत पातळी

क) उत्पादन पातळी

ड) औद्योगिक पातळी

१४) एका चलाच्या सहाय्याने मोजला जाणारा निर्देशांक ---------

अ) संमिश्र निर्देशांक

ब) दोन स्तरीय निर्देशांक

क) एकीकृत निर्देशांक

ड) संयुक्त निर्देशांक

१५) भारतात राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना या पध्दतीचा वापर केला जातो.

अ) उत्पादन पध्दती

ब) उत्पन्न पध्दती

क) खर्च पध्दती

ड) उत्पादन आणि उत्पन्न पध्दती यांचे एकत्रीकरण.

१६) निव्वळ देशांतर्गत उत्पादनाचे मापन करण्याची पद्धत खालील प्रमाणे आहे.

अ) स्थूल  राष्ट्रीय उत्पादनातून घसारा मूल्य वजा

ब) स्थूल देशांतर्गत उत्पादनातून घसारा मूल्य वजा

क) स्थूल देशांतर्गत उत्पादनातून घसारा समाविष्ट

ड) स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून घसारा समाविष्ट

१७) जेव्हा सरकार देशातील नागरिक बँका मध्यवर्ती बँक इत्यादिकडून कर्ज घेते तेव्हा ते –

अ) अंतर्गत कर्ज

ब) सार्वजनिक कर्ज

क) बाहय कर्ज

ड) सरकारचे कर्ज

१८) राज्य वित्तीय धोरण हे ------------

अ) मध्यवर्ती बँक राबविते

ब) भारतीय रिझर्व्ह बँक राबविते

क) सरकार राबविते

ड) व्यापारी बँका राबविते

१९) भांडवल बाजार हा --------

अ) कमी मुदतीच्या निधीचा बाजार होय

ब) दीर्घ मुदतीच्या निधीचा बाजार होय

क) तरलता व्यवस्थापनेचा बाजार होय

ड) स्थानिक बँकर्सचा बाजार होय.

२०) मागणी नुसार पैसे काढले जाणाऱ्या ठेवी

अ) निश्चित कालावधी ठेवी

ब) मागणी ठेवी

क) मुदत ठेवी

ड) आवर्ती ठेवी.

२१) राष्ट्राच्या भोगोलिक सीमांच्या अंतर्गत केली जाणारी वस्तू व सेवांची खरेदी विक्री म्हणजे ---------

अ)विदेशी व्यापार

ब)देशांतर्गत व्यापार

क)निर्यात व्यापार

ड)पुनर्निर्यात व्यापार

२२) व्यापारतोल हा ---------------

अ) देशांतर्गत व्यापारतोल

ब) आंतरराष्ट्रीय व्यापारतोल

क) व्यवहारतोल म्हणतात

ड) पद्धतशीरपणे केलेली नोंदणी

# विधान व तर्क प्रश्न

१) विधान (अ) : सूक्ष्म अर्थशास्त्र विभाजन पध्दतीचा उपयोग करते.
तर्क विधान (ब) : विभाजन पद्धत म्हणजे एका घटकाचा अभ्यास नसून संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास होय.

पर्याय : अ) विधान 'अ' सत्य आहे,पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
ब) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

२) विधान (अ): स्थूल अर्थशास्त्रात सर्वसाधारण किंमत पातळी निश्चिती व त्यातील बदल यांचा अभ्यास असतो.
तर्क विधान (ब) : पण वस्तूची किंमत निश्चिती व उत्पादन घटकांच्या किंमत निश्चितीचा अभ्यास असतो.

पर्याय : अ) विधान 'अ' सत्य आहे,पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
ब) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

३) विधान (अ) :उपयोगिता गरजेच्या तीव्रतेवर अवलंबून असते.
तर्क विधान : उपयोगितेच्या संकल्पनेत नैतिकतेचा विचार नसतो.

पर्याय : अ) विधान 'अ' सत्य आहे,पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.
ब) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.
क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

४) विधान (अ) : सीमांत उपयोगितेच वक्र वर जाणारा असतो.
तर्क विधान (ब) : एखादया वस्तूचा नगांचा उपभोग जसजसा वाढत जातो तसतशी त्यापासून मिळणारी सीमांत उपयोगिता घटत जाते.

पर्याय : अ) विधान 'अ' सत्य आहे,पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.
क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण नाही.

५) विधान (अ) : सर्व इच्छा म्हणजे मागणी नाही.
तर्क विधान (ब) : अर्थशास्त्रीयदृष्ट्या मागणी म्हणजे अशी इच्छा जिला खरेदिशक्तीचे पाठबळ व ते खर्च करण्याची मानसिक तयारी असते.
पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.
ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.
क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण नाही.

६) विधान (अ) : अपवादात्मक परिस्थितीत मागणी वक्र डावीकडून  उजवीकडे खालून वर जाणारा असतो.
तर्क विधान (ब) : अपवादात्मक परिस्थितीत वस्तूंची किंमत वाढते तेव्हा उपभोक्ता अधिक वस्तूंची खरेदी करतो आणि किंमत कमी झाल्यावर कमी वस्तूंची खरेदी करतो.
पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.
ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.
क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण नाही.

७) विधान (अ) : एकक लवचिक मागणीचा वक्र हा आयताकृती परीवालायाचा असतो.
तर्क विधान (ब) : किंमतीतील शेकडा बदलाच्या प्रमाणापेक्षा जेव्हा मागणीतील बदलाचे  प्रमाण जास्त असते तेव्हा त्यास एकक लवचिक मागणी असे म्हणतात.
पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.
ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.
क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.
ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

नाही.

८)विधान (अ) ; एकूण खर्च पध्दतीमध्ये आपण मागणी वक्रावरील एखादया बिंदूची लवचिकता मोजू शकतो.

तर्क विधान (ब) :एकूण खर्च म्हणजे किंमत व मागणी यांचा गुणाकार होय.

पर्याय : अ) विधान 'अ' सत्य आहे,पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

ब) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

९)विधान (अ) : साठ्याशिवाय पुरवठा असू शकत नाही.

तर्क विधान (ब) : साठा पुरवठ्याचे स्त्रोत आहे.

पर्याय : अ) विधान 'अ' सत्य आहे,पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

ब) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

१०)विधान (अ) : श्रमाचा पुरवठा वक्र हा खाली उतरणारा असतो.

तर्क विधान (ब): एका विशिष्ट पातळीनंतर वेतनदर वाढल्यास श्रमाचा पुरवठा कमी होतो.

पर्याय : अ) विधान 'अ' सत्य आहे,पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

ब) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

११)विधान (अ) : मक्तेदार हा किंमत कर्ता असतो.

तर्क विधान (ब) : मक्तेदार हा स्वत:च्या मालाची किंमत निश्चित करतो त्यामुळे त्याचे संपूर्ण बाजार पुरवठ्यावर नियंत्रण असते.

पर्याय : अ) विधान 'अ' सत्य आहे,पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

ब) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण नाही.

१२ )विधान (अ) : वस्तुभेद हे मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

तर्क विधान (ब) : मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तूंना जवळचे पर्याय उपलब्ध नसतात.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सतआहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

१३) विधान (अ) : निर्देशांक हे सांख्यकीय साधन आहे.

तर्क विधान (ब) : निर्देशांक हा मुलत: किंमत पातळीमधील बदल मोजण्यासाठी विकसित केला होता.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

१४) विधान (अ) : निर्देशांकाची रचना करण्यासाठी अंकगणितीय मध्याचा वापर केला जातो.

तर्क विधान (ब) : अंकगणितिय मध्याचा वापर करून तुलनात्मक दृष्ट्या गणना करणे सोपे असते.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

१५) विधान (अ) : राष्ट्रीय उत्पन्नात फक्त अंतिम वस्तू आणि उत्पादित सेवाचे मूल्य विचारात घेतले जाते.

तर्क विधान (ब) : राष्ट्रीय उत्पन्न नेहमी पैशात व्यक्त केले जाते.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

१६) विधान (अ) : हस्तांतरीत देण्याचा राष्ट्रीय उत्पन्नामध्ये समावेश करावा.

तर्क विधान (ब) : निवृत्ती वेतन, बेकारी भत्ता,इ.सारखी हस्तांतरीत देणी हा सरकारी खर्चाचा एक भाग आहे.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

१७) विधान (अ) : सरकारने केलेला खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय.

तर्क विधान (ब) : सार्वजनिक खर्चामध्ये नागरिकांचे सरक्षण , त्यांच्या सामुहिक गरजांची पूर्ती ,सामाजिक कल्याणासाठी केलेला खर्च इ.चा समावेश होतो.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

१८) विधान (अ) : कर्ज उभारणे ही सरकारची सर्वसाधारण कृती आहे.

तर्क विधान (ब) : सरकारी खर्च सर्वसाधरणपणे सरकारी महसुलापेक्षा जास्त असतो.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

१९) विधान (अ) : पतनियंत्रण करणे हे व्यापारी बँकेचे महत्त्वपूर्ण कार्य आहे.

तर्क विधान (ब) : व्यापारी बँका ठेवी निर्माण करतात ठेवीतून कर्ज देतात, कर्जातून ठेवी निर्माण निर्माण होतात व त्यातून पतापैशाची निर्मिती होते.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

२०) विधान (अ) : वायदे बाजार हा नाणे बाजाराचा महत्त्वाचा घटक आहे.

तर्क विधान (ब) : वायदे बाजार ही एक अशी व्यवस्था आहे ज्यामध्ये समभाग,रोखे इत्यादीचा व्यापार होतो.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

२१ ) विधान (अ) : व्यापार हा आर्थिक वृद्धीची गुरुकिल्ली आहे.

तर्क विधान (ब) : देशाच्या आर्थिक विकासात व्यापार महत्त्वाची भूमिका बजावतो.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

२२) विधान (अ) : व्यापारतोलाला व्यवहारतोल असेही म्हणतात.

तर्क विधन (ब) : व्यापार तोलाचा सबंध दृश्य व अदृश्य वस्तूंच्या आयात – निर्यात मूल्यांशी येतो.

पर्याय : अ) विधान ‘अ’ सत्य आहे,पण तर्क विधान ‘ब’ असत्य आहे.

ब) विधान ‘अ’ असत्य आहे, पण तर्क विधान ‘ब’ सत्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

ड) दोन्ही विधाने सत्य असून विधान ‘ब’ हे विधान ‘अ’ चे योग्य स्पष्टीकरण

**प्रश्न क्र. 2 अ) संकल्पना ओळखून त्या स्पष्ट करा.**

१) मालाने तिच्या परिसरातील 25 कुटूंबाकडील उत्पन्न आणि खर्चाची माहिती गोळा केली.

२) रमेश ने 2019-2020 या आर्थिक वर्षासाठी अर्थव्यवस्थेच्या एकूण गुंतवणूक, एकूण रोजगार, एकूण खर्च व एकूण बचत यांचे विश्लेषण केले.

३) रोहनने लाकडांच्या तुकडयांमधून दागिन्यांचा बॉक्स तयार केला.

४) कविताने आपली भूक भागविण्यासाठी अतिरिक्त भाकरीचे सेवन केले.

५) कौशिकने त्याच्या मासिक उपभोगासाठी 10 किलो गहू 40 रुपये प्रतिकिलो दराने विकत घेतला.

६) अमनने आपल्या शिवणकामाच्या दुकानात शिवणकामाचे यंत्र आणि फर्निचर खरेदी केले.

७) दुधाची किंमत 10% ने वाढली तरी किरणच्या दुधाच्या मागणीत बदल झाला नाही.

८) अमूल्याच्या कफेमध्ये चहाची मागणी 5% वाढली, कारण कॉफीच्या किंमतीत 10% वाढ झाली.

९) अमर दररोज 300/- रुपये या भावाने 50 डझन आंब्यांची विक्री करतो.

१०) अजयच्या पापड आणि लोणच्याच्या उत्पादक युनिट मध्ये एकूण 5000/- मशिन साठी 100000/- भाडयासाठी व रुपये 200000/- कामगारांच्या वेतनसाठी खर्च झाला.

११) अनुप हेअर ऑईलला जवळचा पर्याय नाही.

१२) सूर्योदय कॉस्मेटिक कंपनी जाहिरात, रेडिओ आणि दूरदर्शन वर खर्च करते तसेच मागणी वाढविण्यासाठी त्याच्या शॅम्पू उत्पादनाचे विनामूल्य नमुने वितरीत करते.

१३) बॉम्बे स्टॉक एक्सचेंजने सूचीबध्द कंपन्यांची समभागांची किंमत प्रतिबिंबीत करण्यासाठी शेअर बाजाराचा निर्देशांक म्हणून सेन्सेक्स विकसीत केला आहे.

१४) 2015-2020 या कालावधीत महाराष्ट्रातील कच्च्या कापसाच्या उत्पादनात होणारे बदल मोजण्यासाठी कृषी संशोधन संस्थेने निर्देशांक क्रमांक तयार केला.

१५) मनीषने त्याच्या कपडयाच्या कारखान्यात रेडिमेड शर्ट तयार करण्यासाठी 100 मीटर सुती कापड विकत घेतला.

१६) सरला या सेवानिवृत्त शाळेतील शिक्षिकेला शासनाकडून दरमहा रु. 20000/- पेन्शन मिळते.

१७) प्रकाशने लेखा वर्ष 2018-19 दरम्यान, 62,000 रुपये आयकर भरला.

१८) रिजर्व बँक केंद्र सरकार व राज्य सरकार चे बौण्ड्स, सिक्युरिटीज इत्यादी वस्तू विकून कर्ज उभारण्यास मदत करते.

१९) एव्हीम बँक आपल्या ग्राहकांना डिमॅट सुविधा, इंटरनेट बँकिंग आणि मोबाईल बॅकिंग सुविधा प्रदान करते.

२०) केरळची के ज्वेलर्स कंपनीचा शेअर्सद्वारे 1000 कोटी रुपये वाढवण्याचा मानस आहे.

२१) तामिळनाडूने पंजाब व उत्तर प्रदेशातून गहू खरेदी केला.

२२) महाराष्ट्रातील हापूस आंबे आंतराष्ट्रीय बाजारात विकले जातात.

## प्रश्न २ ब फरक स्पष्ट करा.

१) विभाजन पध्दत व राशी पध्दत

२) आंशिक समतोल व सर्वसाधारण समतोल

३) काल उपयोगिता व स्थल उपयोगिता

४) एकूण उपयोगिता व सीमांत उपयोगिता

५) प्रत्यक्ष मागणी व अप्रत्यक्ष मागणी

६) पुरक (संयुक्त) मागणी व संमिश्र मागणी

७) वैयक्तिक मागणी पत्रक व बाजार मागणी पत्रक

८) मागणी वक्र व पुरवठा वक्र
९) मागणीचा विस्तार व मागणीचा संकोच
१०) मागणीतील वृद्धी व मागणीतील ऱ्हास
११) किंमत लवचिकता व उत्पन्न लवचिकता
१२) संपूर्ण लवचिक मागणी व संपूर्ण अलवचिक मागणी
१३) साठा व पुरवठा
१४) पुरवठ्याचा विस्तार व पुरवठ्याचा संकोच
१५) पुरवठ्यातील वृद्धी व पुरवठ्यातील ऱ्हास
१६) एकूण खर्च व एकूण प्राप्ती
१७) अल्पकाळ व दीर्घकाळ
१८) पूर्ण स्पर्धा व मक्तेदारी
१९) मक्तेदारी व मक्तेदारीयुक्त स्पर्धा
२०) साधा निर्देशांक व भारान्वित निर्देशांक
२१) किंमत निर्देशांक व संख्यात्मक निर्देशांक
२२) स्थूल देशांतर्गत उत्पादन व निव्वळ देशांतर्गत उत्पादन
२३) सार्वजनिक वित्तव्यवहार व खाजगी वित्तव्यवहार
२४) महसुली खर्च व भांडवली खर्च
२५) प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर
२६) अंतर्गत कर्ज व बाहय कर्ज
२७) नाणेबाजार व भांडवल बाजार
२८) मागणी ठेवी व मुदती ठेवी
२९) आयात व्यापार व निर्यात व्यापार
३०) अंतर्गत व्यापार व विदेशी व्यापार
३१) व्यवहारतोल व व्यापारतोल

## प्रश्न ३ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा

१) सूक्ष्म अर्थशास्त्राची चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
२) सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.
३) स्थूल अर्थशास्त्राची चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
४) स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.
५) उपयोगीतेचे चार प्रकार स्पष्ट करा.
६) उपयोगितेची चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
७) सीमांत उपयोगिता व किंमत यामधील संबंध स्पष्ट करा.
८) मागणीचे चार प्रकार स्पष्ट करा.
९) मागणीच्या लवचिकतेचे प्रकार स्पष्ट करा.
१०) पुरवठा नियमाचे चार अपवाद स्पष्ट करा.
११) पूर्ण स्पर्धेची चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
१२) अल्पाधिकार म्हणजे काय? अल्पधीकाराची चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

१३) मक्तेदारीची चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
१४) मक्तेदारीयुक्त स्पर्धेची चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
१५) निर्देशांकाचे प्रकार स्पष्ट करा.
१६) खालील आकडेवारीवरून संख्यात्मक निर्देशांक काढा.

| वस्तू | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| मूळ वर्षातील परिमाण | १७० | १५० | १०० | १९५ | २०५ |
| चालू वर्षातील परिमाण | ९० | ७० | ७५ | १५० | ९५ |

१७) राष्ट्रीय उत्पन्नाची चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
१८) राष्ट्रीय उत्पन्नाचे चक्रीय प्रवाहाचे द्विक्षेत्रीय प्रतिमान स्पष्ट करा.
१९) सार्वजनिक उत्पन्नातील करेत्तर उत्पन्नाचे कोणतेही चार स्त्रोत स्पष्ट करा.
२०) भारतीय नाणेबाजारातील संघटित क्षेत्र स्पष्ट करा.
२१) भारतीय नाणेबाजारातील असंघटित क्षेत्र स्पष्ट करा.
२२) व्यापारी बँकेची कार्ये स्पष्ट करा.
२३) भारतीय नाणेबाजाराची भूमिका कोणत्याही चार मुद्दयाद्वारे स्पष्ट करा.
२४) भारतातील भांडवल बाजाराची भूमिका कोणत्याही चार मुद्दयाद्वारे स्पष्ट करा.
२५) विदेशी व्यापाराचे प्रकार स्पष्ट करा.

## प्रश्न ४ खालील विधानाशी तुम्ही सहमत आहात कि नाही ते सकारण स्पष्ट करा.

१) सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती अमर्याद आहे.
२) स्थूल अर्थशास्त्र हे सूक्ष्म अर्थशास्त्रापेक्षा वेगळे आहे.
३) एकूण उपयोगिता महत्तम असतेवेळी सीमांत उपयोगिता शून्य असते.
४) घटत्या सीमांत उपयोगिता सिद्धांताला कोणतेही अपवाद नाहीत.
५) सर्व इच्छा म्हणजे मागणी होय.
६) सीमांत उपयोगितेचा वक्र ऋण असतो.
७) जेव्हा गिफेन वस्तूंची किंमत कमी होते,तेव्हा त्याची मागणी वाढते.
८) मागणीच्या नियमाला कोणतेही अपवाद नाहीत.
९) किंमत आणि मागणी यामध्ये परस्पर विरुद्ध संबंध आहे.
१०) श्रमाचा पुरवठा वक्र पाठीमागे वळणाऱ्या स्वरूपाचा असतो.
११) किंमत आणि पुरवठा यामध्ये प्रत्यक्ष संबंध असतो.
१२) पुरवठ्याच्या सिद्धांताला अनेक अपवाद आहेत.
१३) पूर्ण स्पर्धेतील विक्रेता हा किंमत कर्ता असतो.
१४) मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तुभेद केला जातो.
१५) विक्री खर्च हे एकमेव वैशिष्ट्य मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे आहे.
१६) निर्देशांकामध्ये फक्त किंमत पातळीतील बदल मोजले जातात.
१७) कोणत्याही वर्षाची निवड मूळ वर्ष म्हणून करता येते.
१८) राष्ट्रीय उत्पन्नाची गणना करताना अनेक तात्विक अडचणी येतात.
१९) हस्तांतरित उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो.
२०) सक्तीचे कार्य हे शासनाचे एकमेव कार्य आहे.

२१) खाजगी वित्त व्यवहारापेक्षा सार्वजनिक वित्त व्यवहार अधिक लवचिक असतात.
२२) चलनी नोटांची निर्मिती करणे हे फक्त मध्यवर्ती बँकेचे कार्य आहे.
२३) व्यापारी बँका पतपैशाची निर्मिती करतात.
२४) विदेशी व्यापारामुळे जागतिक पातळीवर श्रमविभागणी व विशेषीकरण होते.
२५) व्यवहारतोल आणि व्यापारतोल यामध्ये कांहीच फरक नाही.

प्रश्न ५ खालील तक्ता,आकृती,उतारा अभ्यासून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

i) तक्ता.

| वस्तूचे नग | एकूण उपयोगिता | सीमांत उपयोगिता |
|---|---|---|
| १ | ४० | |
| २ | ६० | २० |
| ३ | ७० | १० |
| ४ | | ० |
| ५ | ६० | -१० |

अ)वरील तक्ता पूर्ण करा. १ गुण

ब)जेव्हा एकूण उपयोगिता कमी होत जाते तेव्हा सीमांत उपयोगिता ---------- १ गुण

क)एकूण उपयोगिता व सीमांत उपयोगिता वक्र काढा. २ गुण

ii)

| क्ष वस्तूचे नग | क्ष वस्तूची सीमांत उपयोगिता | सीमांत उपयोगिता रुपयामध्ये १नग = १० रु. | बाजार किंमत प्रत्येक नग = ५० रु. | सीमांत उपयोगिता व किंमतीची तुलना |
|---|---|---|---|---|
| १ | १० | १०० | ५० | सी उ > किंमत |
| २ | | ८० | ५० | सी उ > किंमत |
| ३ | ७ | | ५० | सी उ > किंमत |
| ४ | ५ | ५० | ५० | |
| ५ | ३ | ३० | ५० | सी उ < किंमत |
| ६ | १ | १० | ५० | |

अ)वरील तक्ता पूर्ण करा. २गुण

ब)कोणतेही दोन सीमांतपूर्व नग ओळखा

क) कोणतेही दोन सीमान्तोत्तर नग ओळखा

iii)

| क्ष वस्तूची किंमत (रु) | क्ष वस्तूची मागणी (किलो) | | | बाजार मागणी अ + ब + क |
|---|---|---|---|---|
| | ग्राहक ‘अ’ | ग्राहक ‘ब’ | ग्राहक ‘क’ | |
| १० | ५ | १० | १५ | ३० |
| ८ | १० | १५ | | ४५ |
| ६ | | २० | २५ | ६० |
| ४ | २० | | ३० | ७५ |
| २ | २५ | ३० | ३५ | |
| १ | ३० | ३५ | ४० | १०५ |

अ)वरील तक्ता पूर्ण करा २ गुण

ब) बाजार मागणी पत्रकावरून बाजार मागणी वक्र काढा २ गुण

iv)

| किंमत ( रु.) | पुरवठा ( नगसंख्या ) |
|---|---|
| १० | ३०० |
| २० | |
| ३० | ४०० |
| ४० | ४५० |
| ५० | |
| ६० | ५५० |
| ७० | ६०० |

अ)वरील तक्ता पूर्ण करा. १ गुण

ब)किंमत आणि पुरवठा यामधील परस्पर संबंध सांगा. १ गुण

क)वरील पुरवठा पत्रकावरून पुरवठा वक्र काढा. २ गुण

v)

| किंमत प्रतिनग (रु) | मागणी ( नग ) | पुरवठा ( नग ) |
|---|---|---|
| ५ | १०० | ५०० |
| ४ | | ४०० |
| ३ | ३०० | |
| २ | | २०० |
| १ | ५०० | |

अ)वरील तक्ता पूर्ण करा २ गुण

ब)वरील तक्त्याचा वापर करून समतोल किंमतीची आकृती काढा. २ गुण

vi)

| वस्तू | २०१५ च्या किंमती (मूळ वर्ष)P० | २०१९ च्या किंमती ( चालू वर्ष) P१ |
|---|---|---|
| ल | २० | ३० |
| म | ६० | ८० |
| न | १०० | १३० |
| ओ | ४० | ६० |
| एकूण | ∑P० = | ∑P१ = |

अ)वरील तक्ता पूर्ण करा. १ गुण

ब)वरील माहितीच्या आधारे किंमत निर्देशांक काढा. ३ गुण

vii)

| २०१८ वर्षाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे घटक | कोटी रपये |
|---|---|
| उपभोग | २०० |
| गुंतवणूक | ३०० |
| सरकारी खर्च | ४०० |
| निव्वळ निर्यात | -१०० |
| निव्वळ येणी | -५० |
| घसारा | १०० |

अ)सूत्र पूर्ण करा


GNP = C + ☐ +G + (X – M) + ☐ १ गुण

किंवा

स्थू.रा.उ. = उपभोग खर्च + ☐ + सरकारी खर्च + (निर्यात – आयात) + ☐

ब) वरील माहितीच्या आधारे स्थूल राष्ट्रीय उत्पादन आणि निव्वळ राष्ट्रीय उत्पादन काढा.

आकृती ३ गुण




प्रश्न


अ) एकूण उपयोगिता वाढते तेव्हा सीमांत उपयोगिता ----------- १ गुण

ब) कोणत्या बिंदुनंतर समाधानाचे रुपांतर असमाधानात होते १ गुण

क) जेव्हा एकूण उपयोगिता महत्तम असते तेव्हा सीमांत उपयोगिता ---------- १ गुण

ड) कोणत्या नागाचे सेवन केल्यानंतर उपभोक्त्याला सर्वाधिक समाधान मिळते. १ गुण

ii)





अ) मागणी वक्र म१म१ -------- दर्शिवतो १ गुण

ब) मागणी वक्र म२म२ -------- दर्शिवतो १ गुण


क) आकृती ओळखा आणि स्पष्ट करा. २ गुण

iii)

अ




ब





अ) अ  आकृतीत मागणीतील --------- दर्शविला आहे. १ गुण

ब) ब आकृतीत मागणीतील --------- दर्शविला आहे. १ गुण

क) अ  आकृतीतील मागणी वक्र -------- च्या दिशेने सरकतो. १ गुण


ड) ब  आकृतीत मागणी वक्र -------- च्या दिशेने सरकतो. १ गुण




अ) वरील आकृत्यामध्ये मागणी वक्राची लवचिकता कोणती आहे ते सांगा २ गुण

ब) वरील आकृत्यामध्ये मागणी वक्राचा उतार कसा आहे ते लिहा. २ गुण

v)





अ) वरील आकृती मागणीची लवचिकता मोजण्याच्या कोणत्या पद्धतीसाठी वापरली जाते.
१ गुण

ब) म३  बिंदू कोणती मागणीची लवचिकता दर्शविते                                   १            गुण

क) म२ बिंदूची लवचिकता सूत्राचा वापर करून काढा                                  २ गुण


vi)




अ) वरील आकृतीतील समतोल बिंदू आणि समतोल किंमत सांगा .     २ गुण

ब) वरील आकृतीच्या सहाय्याने समतोल किंमत संकल्पना स्पष्ट करा. २ गुण

**राष्ट्रीय उत्पन्नाचे चक्रीय प्रवाह द्विक्षेत्र प्रतिमान**




अ) वरील आकृतीच्या सहाय्याने वास्तव उत्पन्न प्रवाह संकल्पना स्पष्ट करा          २ गुण

ब) वरील आकृतीच्या सहाय्याने पैशातील उत्पन्न प्रवाह संकल्पना स्पष्ट करा.        २ गुण

## 3) उतारा

१) मोनाने तिच्या घराजवळच्या शॉपिंग मोलाला भेट दिली. तिने पूर्ण महिन्याचा किराणा माल विकत घेतला ज्यात तांदूळ,गहू,साखर,खाद्य तेल आणि डाळींचा समावेश आहे. सणासुदीचे दिवस जवळ येत असल्या कारणाने तिला साखरेची किंमत वाढेल असे वाटते म्हणून तिने नेहमीपेक्षा जास्त साखर खरेदी केली

तिथे तिला तुरडाळीचे दोन वेगवेगळे प्रकार आढळले. त्यामध्ये एक हलक्या प्रतीची व दुसरी दर्जेदार प्रतीची तुरडाळ होती.कमी किंमत असली तरी तिने हलक्या प्रतीची तुरडाळ खरेदी केली नाही त्याऐवजी तिने दर्जेदार प्रतीची तुरडाळ विकत घेतली.

प्रश्न :-

१) दिलेल्या परिच्छेदात गरजेपेक्षा जेव्हा जास्त साखर मोना विकत घेते यात मागणीच्या नियमाचा कोणता अपवाद दिसून येतो. (१)

२) हलक्या प्रतीची तुरडाळ यात वस्तूचा कोणता प्रकार दिसून येतो (१)

३) वरील माहितीच्या आधारे तुमचे स्वमत स्पष्ट करा. (२)

---

२) आईसक्रीम ब्रँडच्या पहिल्या वर्गाच्या श्रेणीमध्ये अमूलही बऱ्याच आईस्क्रीमप्रेमींची पहिली पसंती आहे. गुजरात सहकारी दूध विपणन महासंघाच्या मालकीच्या अमूल ब्रँडची स्थापना 1946 मध्ये गुजरात मधील आनंद येथे झाली.

भारतातील टॉप आइस्क्रीम ब्रँडच्या यादीतील दुसरे म्हणजे वडिलाल.

कॉर्नेटो आणि मॅग्नम हिंदुस्तान युनिलिव्हरच्या मालकीच्या भारतातील टॉप आइसक्रीम ब्रँडपैकी एक आहे. भारतीय आईस्क्रीम उद्योगातील मदर डेअरी हे खूप मजबूत नाव आहे. ही कंपनी अमूल सारखीच आहे, उत्पादनांच्या बाबतीत ते तयार करतात आणि विकतात.

आईस्क्रीम उद्योगातील आणखी एक मोठा खेळाडू हॅव्हॉमर आहे. हॅव्हॅमोर कंपनी बऱ्याच दिवसांपासून भारतातील टॉप आइस्क्रीम ब्रँड्सच्या लढाईत बलाढ्य सैनिक म्हणून उभी राहू

शकली आहे. आइस्क्रीम मार्केट मध्ये टॉप ब्रँड शिवाय स्थानिक आणि कमी लोकप्रिय ब्रँड देखील आहेत.

सर्वाधिक काळची जाहिरात मोहीम राबविण्याच्या अमर हा गिनीजमध्ये (आणि अजून ही आहे) विक्रम आहे. डिजिटल मार्केटींगच्या माध्यमातून अमूलच्या जाहिरात धोरणात फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम आणि इतर अशा प्लॅटफॉर्मवरुन बरेच काही झाले.

१) आईस्क्रीम बाजाराचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य ओळखा (१)

२) जाहिरात मोहिमांवर आणि कार्यनीतींवर फर्मांकडून किती खर्च केला जातो ते ओळखा. (१)

3) वरील माहितीच्या आधारे आईस्क्रीम बाजाराबद्दल आपले वैयक्तिक मत व्यक्त करा. (२)

---

3) भारतात ऑटोमोबाईल्स, सिमेंट, स्टील, ॲल्युमिनियम इत्यादीची बाजारपेठ ही अल्पाधिकार बाजारपेठची उदाहरणे आहेत. या सर्व बाजारामध्ये प्रत्येक विशिष्ट उत्पादनासाठी काही विशिष्ट कंपन्या आहेत.

द्वयाधिकार हे अल्पाधिकाराचा एक विशेष प्रकार आहे, ज्यात दोन विक्रेते आहेत. द्वैवार्थाच्या अंतर्गत असे मानले जाते की दोन कंपन्यांनी विकलेले उत्पादन एकसंघ आहे आणि त्यास पर्याय नाही. दोन कंपन्या बाजारात मोठ्या प्रमाणात नियंत्रण ठेवणारी उदाहरणे आहेतः (i)सॉफ्ट ड्रिंक मार्केटमधील पेप्सी आणि कोका-कोला; (ii) व्यावसायिक मोठ्या जेट विमानांच्या बाजारात एअरबस आणि बोईंग.

स्मार्टफोन आणि संगणकांसाठी ऑपरेटिंग सिस्टम मोठ्या तंत्रज्ञानामध्ये अल्पाधिकाराचे उत्कृष्ट उदाहरणे प्रदान करतात. ऍपल आयओएस आणि गूगल अँड्रॉइड स्मार्टफोन ऑपरेटिंग सिस्टमवर अधिराज्य गाजवतात.संगणक ऑपरेटिंग सिस्टम आणि मायक्रोसॉफ्ट ऍपल विंडोजच्या छायेत आहेत.

प्रश्न :-

१) भारतातील अल्पाधिकार बाजारपेठेचे एक उदाहरण द्या. (१)

२) द्वयाधिकार ही संकल्पना एका उदाहरणाने स्पष्ट करा. (१)

३) वरील उताऱ्या विषयी तुमचे व्यक्तिगत मत नोंदवा (२)

---

**उतारा ४**

कोरोनामुळे अर्थव्यवस्था मंदावली आहे.कोरोना रोखण्यासाठी केलेल्या लॉकडाऊनमुळे उत्पादन व व्यापार बंद राहिल्याने या आर्थिक वर्षात अर्थव्यवस्था विस्तारण्याऐवजी आकुंचन पावणार आहे. ही बाब अर्थसंकल्पात स्पष्ट केली आहे.भारताच्या इतिहासातील हा प्रथमच कागदविहीन अर्थसंकल्प आहे.तसेच अर्थव्यवस्था आकुंचन पावत असताना मांडला गेलेला हा स्वातंत्र्यानंतरचा तिसरा अर्थसंकल्प आहे.या अर्थसंकल्पात वित्तीय तूट ५ टक्क्याहून अधिक दाखविण्यात आली आहे.

एकीकडे कोरोनामुळे अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम आणि दुसरीकडे सर्वच क्षेत्राच्या वाढत्या अपेक्षा यांचा समतोल साधत अर्थव्यवस्थेला वेग देण्याचा प्रयत्न करणारा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सादर केला आहे.आरोग्य सेवेसाठीच्या तरतुदीत १३७ टक्क्यांनी भरभक्कम वाढ हे या अर्थसंकल्पाचे  वैशिष्ट्य आहे.या अर्थसंकल्पामध्ये २०२१ – २०२२ या वर्षात अपेक्षित उत्पन्न ३४,३५.००० कोटी रुपये आणि अपेक्षित खर्च ३५,८३,००० कोटी रुपये व्यक्त केला आहे.

पायाभूत सुविधा, शिक्षण,कृषी उत्पादन, रोजगारनिर्मिती आणि उद्योगांना चालना देण्याचा प्रयत्न यामध्ये केलेला आहे.परंतु प्राप्ती कराची स्थिती पूर्वीप्रमाणेच ठेवलेली आहे.कृषी कर्जासाठी १६.५ लाख कोटी,आरोग्य सुविधेसाठी २,२३,००० हजार कोटी,वीज वितरण योजनेसाठी ३लाख कोटी,लघु – मध्यम उद्योगासाठी १५,७०० कोटी आणि सरकारी बँक भांडवलासाठी २०,००० कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पामध्ये केलेली आहे.

१) आरोग्य सेवेसाठीच्या तरतुदीत किती टक्क्यांनी वाढ केली आहे? (१)

२) या अर्थसंकल्पात कोणकोणत्या क्षेत्रांना चालना देण्याचा प्रयत्न केलेलाआहे? (१)

३) उताऱ्यातील माहितीच्या आधारे तुमचे व्यक्तिगत मत नोंदवा (२)

---

५) उदारीकरणानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी म्युच्युअल फंड, मर्चंट बँकिंग, व्हेंचर कॅपिटल फंडिंग इत्यादी पारंपारिक क्रियांमध्ये विविधता आणली आहे. तसेच भाड्याने देणे, भाड्याने देणे आणि फॅक्टरिंग सेवा अशा पॅरा-बँकिंग कार्यातही वाढ आहे.

मर्चंट बँकिंगमध्ये इश्यू मॅनेजमेंट, प्रोजेक्ट काउन्सिलिंग, वर्किंग कॅपिटल फायनान्सिंग, फॉरेन चलन लोन, पोर्टफोलिओ मॅनेजमेंट इ.

किरकोळ बँकिंग व्यक्तीस वैयक्तिक वापरासाठी आर्थिक सेवा देतात जसे गृहनिर्माण कर्जे, ग्राहक टिकाऊ वस्तूंसाठी कर्ज, वाहन कर्ज, शैक्षणिक कर्ज, क्रेडिट कार्ड इ.

बँकांना जीवन विमा व्यवसायात प्रवेश करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

१) उदारीकरणानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी केलेल्या विविधतेची क्षेत्रे ओळखा (1)

२) रिटेल बँकिंग अंतर्गत देऊ केलेल्या आर्थिक सेवांचा उल्लेख करा. (1)

३) वरील उतारा आधारित आपले वैयक्तिक मत द्या. (२)

**प्रश्न ६ सविस्तर उत्तरे लिहा.**

१) सूक्ष्म अर्थशास्त्र संकल्पना स्पष्ट करून तिची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
२) स्थूल अर्थशास्त्राची संकल्पना स्पष्ट करून तिची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
३) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धान्त अपवादासह स्पष्ट करा.
४) मागणीचा नियम स्पष्ट करून मागणीच्या नियमाचे अपवाद स्पष्ट करा.
५) मागणीची किंमत लवचिकता संकल्पना स्पष्ट करून मागणीच्या किंमत लवचिकतेचे प्रकार स्पष्ट करा.
६) मागणीची लवचिकता मोजण्याची एकूण खर्च पध्दत व भूमिती पध्दत स्पष्ट करा.
७) पुरवठ्याचा नियम स्पष्ट करून पुरवठ्याच्या नियमाचे अपवाद स्पष्ट करा.
८) पूर्ण स्पर्धा म्हणजे काय? पूर्ण स्पर्धेतील किंमत निश्चिती स्पष्ट करा.
९) निर्देशांकाची व्याख्या स्पष्ट करून निर्देशांक रचनेच्या पायऱ्या स्पष्ट करा.
१०) राष्ट्रीय उत्पन्न मापनात येणाऱ्या व्यावहारिक अडचणी स्पष्ट करा.
११) राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या उत्पन्न पध्दती आणि खर्च पध्दती स्पष्ट करा.
१२) राष्ट्रीय उत्पन्न मापनाची उत्पादन पध्दत सविस्तर स्पष्ट करा.
१३) सार्वजनिक उत्पन्न म्हणजे काय? सार्वजनिक उत्पन्नाचे स्त्रोत स्पष्ट करा.
१४) सार्वजनिक खर्च वाढीची वेगवेगळी कारणे स्पष्ट करा.
१५) रिझर्व्ह बँकेची कार्ये स्पष्ट करा.